आर.सी.सी क्र. १५४३/२०१३

सरकार विरुध्द सलमान खान

**निशाणी क्र. ३३ / क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक– ३ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव — श्री. दिगंबर फकीरराव चौंधे,**

वय — ५६ वर्षे, व्यवसाय — शेती,

निवासस्थान– मोहाडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

---------------------------------------------------

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. ए. झेड. काझी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. दिनांक २०.०४.२०१३ रोजी माझी व पोलीसांची फिर्यादी श्री. रिंधे यांच्या घरी भेट झाली होती. फिर्यादीच्या घरी चोरी झाली होती. तेंव्हा मी फिर्यादीला मोहाडी येथून भेटण्यास आलो होतो. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. मला आता घटनास्थळ पंचनामा दिनांक २०.०४.२०१३ रोजीचा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक–१ वर सही आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी क्र.३४** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र.२ करीता श्री. व्ही. एस. निकाळजे, विधीज्ञ यांचे द्वारा– .**

२. मी फिर्यादीचा नातेवाईक आहे. घटनास्थळ पंचनामा किती वाजता सुरू केला व किती वाजता संपला हे मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावर मी पोलीस स्टेशनला सही केली. मी फिर्यादीकडे सकाळी सात वाजता गेलो होतो. असे काही झाले नाही की, सकाळी सात वाजता पंचनामा करण्यात आला. हे मला आठवत नाही की, मी फिर्यादी सोबत घटनेनंतर पोलीस स्टेशनला गेलो होतो की नाही. हे म्हणने खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष करण्यात आला नाही व फिर्यादी हे माझे नातेवाईक असल्यामुळे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी को–या कागदावर सही केली. हे म्हणने खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ करीता श्री. एस. एस. कुरेशी, विधीज्ञ यांचे द्वारा–</u>**

३. सदर घटनेला खुप दिवस झाल्यामुळे घटनास्थळ काय होते हे मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळाचे चतुःसिमा मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास –संपला.**

**फेरतपास – काही नाही.**

| | |
|---|---|
| <u>समक्ष</u> | <u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u> |
| –/स्वाक्षरीत/– | –/स्वाक्षरीत/– |
| ( श्रीमती ए.डी. बोस ) | ( श्रीमती ए.डी. बोस ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

**दिनांक–** २६/११/२०२४